# १. मामू

**शिवाजी सावंत** (१९४० ते २००२) :

सुप्रसिद्ध कादंबरीकार. 'मृत्युंजय' ही त्यांची कादंबरी म्हणजे त्यांच्या लेखनकर्तृत्वाचे शिखर आहे. चरित्रात्मक कादंबरीलेखन हे त्यांचे आवडते लेखनक्षेत्र. 'छावा', 'युगंधर', 'लढत' या प्रसिद्ध कादंबऱ्या. 'अशी मने असे नमुने', 'मोरावळा', 'लाल माती रंगीत मने' हे व्यक्तिचित्रण संग्रह प्रसिद्ध. 'शेलका साज', 'कांचनकण' हे ललितलेखन प्रसिद्ध. भारतीय ज्ञानपीठाचा 'मूर्तिदेवी' पुरस्कार, सर्वोत्कृष्ट वाङ्मयाच्या महाराष्ट्र राज्य पुरस्काराने पाच वेळा गौरवान्वित. 'पूनमचंद भुतोडिया' हा बंगाली पुरस्कार, पुणे विद्यापीठातर्फे 'जीवनगौरव' पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित. १९९० यावर्षी साहित्याच्या नोबेल पारितोषकासाठी नामांकन.

'मामू' हा व्यक्तिचित्रणात्मक पाठ असून मामूच्या स्वभावाच्या विविध पैलूंचे वर्णन पाठात केले आहे. प्रामाणिक, देशाभिमानी, नम्र, सेवाभावी व सहृदयी असलेला 'मामू' माणुसकीचे विलोभनीय दर्शन घडवतो. समर्पक शब्दरचना, चित्रदर्शी लेखनशैली यांमुळे 'मामू' हे व्यक्तिमत्त्व परिणामकारकतेने मनाला भिडते.



'घण् घण् घण्ऽऽ!' थोराड घंटेचे टोलांवर टोल पडत राहतात. चैतन्याचे छोटे कोंब उड्या घेत वाड्याच्या प्रार्थनामंदिराकडं एकवटू लागतात. समाधानी चर्येनं मामू स्टुलावरून खाली उतरतो.

रांगा धरून उभे राहिलेले अनघड, कोवळे कंठ जोडल्या हातांनी आणि मिटल्या डोळ्यांनी भावपूर्ण सुरात प्रार्थनेतून अज्ञात शक्तीला आळवू लागतात.

मामू एका दगडी खांबाला रेलून आपली चुनेवाणाची सफेद दाढी कुरवाळत ती समूह प्रार्थना ऐकत राहतो. त्याचं मन कशात तरी गुंतून पडतं.

प्रार्थना संपते. 'जनगणमन'ची इशारत मिळते. खांबाला रेललेला मामू पाय जोडून सावधानचा पवित्रा घेऊन खडा होतो.

या शाळेचा मामू एक अवयव झालाय. गेली चाळीस वर्षे तो आपल्या अलिबाबाच्या हातानं घंटेचे टोल देत, असे चैतन्याचे कोंब नाचवत आलाय. कोल्हापूर संस्थान होतं तेव्हा राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील मामूची नेमणूक आहे. त्यानं दोन राज्यं बघितली. संस्थानाचं आणि लोकशाहीचं. कोल्हापूरकरांच्या कैक पिढ्या बघितल्या.

मामूच्या सफेद दाढीत जेवढे केस आहेत तेवढ्या त्याच्या आठवणी असतील! खूप बघितलंय आणि भोगलंय त्यानं. महाराजांचा मुक्काम पन्हाळ्यावर पडला तर मामूला भल्या पहाटे उठून साथीदारांसह चौदा मैलांची पायपीट करावी लागलीय; पण ही आठवण सांगताना कुठं वेदनेची कळ त्याच्या दाढीधारी चर्येवर तरळत नाही. उलट एका सच्च्या सेवकाला शोभेल अशी अभिमानाची झालर त्याच्या मुखड्यावर उतरते. डोळे किलकिले करत, भुवया आक्रसून त्याच्या बुढ्या देहातील उमदं मन बोलून जातं, 'सर, फाटेचं धुक्यातनं पन्हाळ्यावर चढणं लई गमतीचं. आता वाटतं पर न्हाई झेपत.'

संस्थानं विलीन झाली आणि असा इमानी चाकरवर्ग चौवाटा पांगला. त्यातच मामू या शाळेत रुजू झाला. एक शिपाई म्हणून.

डुईला अबोली रंगाचा फेटा, अंगात नेहरू शर्टावर गर्द निळं जाकीट, जाकिटाच्या खिशात चांदीच्या साखळीचं एक जुनं पॉकेट वॉच, खाली घेराची आणि घोट्याजवळ चुण्या असलेली तुमान, पायात जुनापुराणा पंपशू हा मामूचा पोशाख आहे.

शाळेत तो शिपाई आहे; पण शाळेबाहेर तो बहुरूपी आहे. कुठं फळांच्या मार्केटमध्ये एखाद्या बागवानाच्या दुकानावर घटकाभर बसून त्याचं दुकान चालव, तो हातावर ठेवेल ते अल्लाची खैर म्हणून आपलंसं कर; कुठं एखाद्या मुस्लिम अधिकाऱ्याच्या बच्चाबच्चीला उर्दूची शिकवण दे. एक ना दोन नानातऱ्हेचे उद्योग मामू करतो.

शाळेतील लोकांना तो शिपाई वाटतो. शाळेबाहेरच्या लोकांना त्याची अनेक रूपं दिसतात. मौलवी, व्यापारी, उस्ताद या सगळ्यांचा अंतर्भाव करता येईल असं साऱ्यांनी त्याला सुटसुटीत नाव देऊन टाकलंय-मामू!

दहा वर्षांपूर्वी मी या शाळेत रुजू झालो तेव्हापासून या माणसाला जवळून पारखत आलोय. गरीब माणसानं किती आणि कसं हुशार असावं याचा मामू एवढा मासला मला काही बघायला मिळालेला नाही.

मी मामूच्या घरी गृहप्रवेशाच्या कार्यक्रमाला गेलो. त्याची कर्तबगारी बघून खूप समाधान वाटलं. मामूनं केलेल्या कष्टमय चाकरीचं फळ म्हणून असेल; पण त्याची सगळीच मुलं गुणवान निघालीत. पैसा कमावतात म्हणून माज नाही. बापाचा शब्द त्यांच्या लेखी शेवटचा शब्द आहे. तो कधी खाली पडत नाही.

असंच एकदा मामूच्या घरी त्याच्या दुसऱ्या नंबरच्या मुलाचं 'शादी मुबारक' निघालं. ठरल्याप्रमाणं मामू मला आमंत्रण द्यायला आला. ''सर, पोराचं लग्न हाय. यायला पाहिजे.''

''मामू, तुमच्या पोराचं लग्न आहे तर न येऊन कसं चालेल? नक्की येईन.'' मी उत्तर दिलं.

एका मित्राला घेऊन संध्याकाळी शादीच्या मंडपात गेलो. मंडप माणसांनी भरला होता. मामूनं पुढे येत मला हाताला धरून आघाडीला नेऊन बसवलं.

त्या मंडपात आमदार होते, खासदार होते, बडे व्यापारी होते, शिक्षक, प्राध्यापक होते. हयातभर अंगावर पट्टा चढवून शिपाई म्हणून केलेल्या चाकरीचं चीज झाल्याचं समाधान त्याच्या सफेद दाढीभर पसरलं होतं. निका लागला. मामूनं जमलेल्या लोकांचे आभार मानण्यासाठी माईक हातात घेतला.

''आज माज्या मुलाच्या लग्नाला आमदारसाहेब आलेत, खासदारसाहेब आलेत, मृत्युंजयकार आलेत- माज्या गरिबाच्या...'' मामूचा कंठ दाटून आला. त्याला बोलता येईना. त्याची अनुभवानं पांढरी झालेली दाढी थरथरत राहिली. मामूनं कसेबसे आभार मानून हातातील माईक खाली ठेवला.

'धर्मापेक्षा माणूस मोठा आहे आणि माणसापेक्षा माणुसकी फार फार मोठी आहे!' असे विचार घेऊनच त्या दिवशी मी मंडपातून बाहेर पडलो.

मामूचा शेवटचा बच्चा शाबू माझ्या हाताखाली शिकला. चांगल्या गुणांनी एस. एस. सी. पास झाला. तो पास होताच मामूचं माझ्यामागं लकडं लागलं, ''सर, शाबूला कुठंतरी चिकटवा.''

''मामू, हा शेवटचा बच्चा. तुमच्यात कुणीच पदवीधर नाही. याला शिकू द्या. याला नोकरीत अडकवलात, की हा संपला. जरा नेट धरा. काही अडलं नडलं मला सांगा.'' मी मामूला दिलासा देत होतो.

बदलत्या काळाची पावलं ओळखून मामूनं निर्धार बांधला. पोराला कॉलेजात दाखल केलं.

परवा परवा मामूची बुढी आई अल्लाला प्यारी झाली. तिच्या आठवणी सांगताना मामूच्या डोळ्यांत पाणी तरळलं. 'दुनियेत सारं मिळेल सर; पण आईची माया कुणाकडनं न्हाई मिळायची', हे त्याचे बोल ऐकताना

नातवंडं असलेला मामू मला त्याच्या शाबूसारखा पोर–वयाचा वाटला. त्याची आई वारली त्या दिवशी शाळेला सुट्टी मिळाली.

हे हायस्कूल शंभर वर्षांवर जुनं आहे. इथलं रेकॉर्ड त्यामुळं अवाढव्य आहे. कुणी माजी विद्यार्थी येतो. १९२०–२२ सालातील आपल्या नावाचा दाखला मागतो. मामू ते रजिस्टर अचूक शोधून त्याचं नाव धुंडून काढतो. हाती दाखला पडलेला, बाप्या झालेला विद्यार्थी मामूचा हात हातात घेऊन म्हणतो, ''चलो मामू, चाय लेंगे.''

''कशाला? नगं आत्ताच घेतलाय. कुठं हाय आता तुम्ही?'', मामू त्याचा चहा नाकारण्याचा प्रयत्न करतो. मनात जुन्या आठवणी रेंगाळणारा विद्यार्थी त्याचा हात खेचून त्याला आग्रहानं चहाला नेतो. मग चहा पिता पिता त्याच्या वेळच्या शिक्षकांच्या आठवणींना उजाळा मिळतो. 'एम. आर. सर भारी माणूस. केवढा आब होता त्या वक्ताला हायस्कूलचा.' मामू हरवलेल्या काळाला मुठीत पकडण्याचा प्रयत्न करतो.

ही शाळा सरकारी आहे. इथं ड्रॉईंगच्या, कॉमर्सच्या सरकारी सर्टिफिकेटच्या परीक्षांचं केंद्र आहे. या परीक्षा आल्या, की बुढा मामू पाखरागत हालचाली करू लागतो. नंबर टाकणं, बाकडी हालवून बैठकीची व्यवस्था करणं, पाणी देण्यासाठी गोरगरिबांची पोरं ऑफिसात आणून दाखल करणं. पडेल ते काम मामू उत्साहानं करू लागतो.

कधी खेळताना, कधी प्रार्थनेच्या वेळेला एखादं पोरगं चक्कर येऊन कोसळतं. रिक्षा आणून, त्यात त्या पोराला घालून डॉक्टरकडं नेताना मामू त्याला आईच्या मायेने धीर देत म्हणतो, ''घाबरू नकोस. ताठ बस. काय झालं न्हाई तुला.''

सव्वीस जानेवारी, पंधरा ऑगस्ट या राष्ट्रीय दिवशी कधी कधी मामूच्या हातानं इथला राष्ट्रध्वज, दंडावर सरसरत चढतो. शाळेच्या तिसऱ्या मजल्यावरच्या माथ्यावर निकोप वाऱ्यावर फडफडत राहतो. फेट्याजवळ हाताचा पंजा भिडवून मामू राष्ट्रगीत संपेपर्यंत ध्वजाकडं मान उंचावून बघत राहतो.

माझ्याकडं कुणी बडा पाहुणा आला, की मामूकडं बघत नुसती मान डुलवली, की तिचा इशारा पकडत मामू चहाची ऑर्डर देतो. पाहुणा बसेपर्यंत चहा दाखल होतो. ''राजे, चहा केव्हा सांगितलात?'' पाहुणा आश्चर्यानं विचारतो. मी उत्तर देतो, ''ऐतिहासिक काळात वावरतो ना सध्या! नुसती इशारतीबरहुकूम कामं होतात आमची!''

एकदा मी आणि मामू शाळेच्या व्हरांड्यात बाकावर गप्पा मारत बसलो. त्या दिवशी मामू खुलला होता. संस्थानिकांच्या काळच्या, वाड्यावरच्या एक–एक अजब गमती सांगत होता. तीन तास केव्हा मागं पडले होते दोघांनाही कळलं नाही.

प्रसंगी मामू एखाद्या कार्यक्रमाच्या वेळी मुलांच्यासमोर दहा–वीस मिनिटे एखाद्या विषयावर बोलू शकतो. त्याला जसं उर्दूचं ज्ञान आहे तसंच त्याला वैद्यकाचंही ज्ञान आहे. लहानसर चण असलेल्या शिक्षकाला तो म्हणतो, ''काय पवार सर, काय ही तब्येत? पैसं काय कोन उरावर बांधून नेणार जाताना? जरा अंग धरीसारकं कायतरी खावा. मी सांगतो तुमाला. साखरेच्या पाकात तूप घालून त्यात शेरभर साफ धुतलेल्या खारका बिया काढून पंधरा दिस मुरतीला घाला. रोज सकाळी अनोशा पोटी दोन–दोन खावा. म्हयन्याभरात तुमाला कुनी वळखनार न्हाई!''

कुणाच्या पायाला लागलं तर त्यावर कुठला पाला वाटून लावावा याचा सल्ला द्यायला मामू विसरत नाही. कुणाचं पोट बिघडलं तर त्यावर कुठला काढा प्यावा याची सूचना द्यायला तो चुकत नाही.

शाळेत एखादा कार्यक्रम निघाला, की त्याची आखणी मामूच्या हातात येते. फ्लॉवरपॉटपासून टेबलक्लॉथपर्यंत सारी जुपी जोडून देऊन पुन्हा कार्यक्रमाच्या वेळी एखादा कोपरा धरून, वक्ता काय काय बोलतो हे तो नीट ध्यान देऊन ऐकतो. कार्यक्रम संपला, की मामूला विचारावं, 'कसा झाला कार्यक्रम?' वक्त्यात काही खास नसेल तर नाराजी प्रकट करण्याचीही त्याची एक ढब आहे. 'बोललं चांगलं ते, पर म्हनावी तशी रंगत न्हाई भरली.'

आणखी वर्षानंतर मामू या शाळेतून सेवानिवृत्त होणार. रोजाना दिसणारा त्याचा अबोली रंगाचा फेटा आणि सफेद दाढी आता दिसणार नाही. माणसाच्या आयुष्याला कुठं ना कुठं वळण असतं. टाळतो म्हटल्यानं ते नाही टाळता येत.

सरकारी नियमच आहे. त्याप्रमाणे मामूला घरी जावं लागणार; पण मला मात्र वाटत राहातं, की त्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्याच्या हातानं इथल्या थोराड घंटेचे

'घण् घण् घण्' असे टोल पडत राहावेत. त्या टोलांच्या तालावर चैतन्याचे अगणित कोवळे कोंब नाचत राहावेत. जोडल्या हातांनी आणि मिटल्या डोळ्यांनी, कवळिकीच्या असंख्य अनघड कंठांतून प्रार्थनेचे धीरगंभीर बोल असेच उमटत राहावेत आणि दगडी खांबाला रेलून ते प्रार्थनाबोल ऐकताना बुढा, पार बुढा झालेला मामू असा कसल्यातरी विचारात कायमचा हरवलेला बघायला मिळावा.

(लाल माती रंगीत मने)

## कृती

**(१) (अ) कोण ते लिहा.**

(१) चैतन्याचे छोटे कोंब-

(२) सफेद दाढीतील केसांएवढ्या आठवणी असणारा-

(३) शाळेबाहेरचा बहुरूपी-

(४) अनघड, कोवळे कंठ-

**(आ) कृती करा.**

(१) **लेखकाने विद्यार्थ्यांचे वर्णन करण्यासाठी वापरलेले शब्दसमूह** →

(२) **मामूची शालाबाह्य रूपे** →

**(इ) खालील वाक्यांतून तुम्हांला समजलेले मामूचे गुण लिहा.**

(१) मामू सावधानचा पवित्रा घेऊन खडा होतो. ...............

(२) आईच्या आठवणी सांगताना मामूच्या डोळ्यांत पाणी येते. ...............

(३) मामू त्याला आईच्या मायेने धीर देत म्हणतो, ''घाबरू नकोस. ताठ बस. काय झालं न्हाई तुला.'' ...........

(४) माझ्याकडं कुणी बडा पाहुणा आला, की मामूकडं बघत नुसती मान डुलवली, की तिचा इशारा पकडत मामू चहाची ऑर्डर देतो. ...............

(५) मामू एखाद्या कार्यक्रमात मुलांच्यासमोर दहा-वीस मिनिटे एखाद्या विषयावर बोलू शकतो. ...........

**(ई) खालील शब्दसमूहांचा अर्थ लिहा.**

(१) थोराड घंटा (२) अभिमानाची झालर

**(२) व्याकरण.**

**(अ) खालील शब्दांतील अक्षरे निवडून अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

(१) इशारतीबरहुकूम (२) आमदारसाहेब (३) समाधान

**(आ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यांत उपयोग करा.**

(१) चौवाटा पांगणे-

(२) कंठ दाटून येणे-

(३) हरवलेला काळ मुठीत पकडणे-

(इ) खालील शब्दांचे दिलेल्या तक्त्यामध्ये वर्गीकरण करा.

(१) अनुमती (४) घटकाभर (७) नानातऱ्हा (१०) अभिवाचन
(२) जुनापुराणा (५) भरदिवसा (८) गुणवान
(३) साथीदार (६) ओबडधोबड (९) अगणित

| उपसर्गघटित | प्रत्ययघटित | अभ्यस्त |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

(३) स्वमत.

(अ) 'शाळेत तो शिपाई आहे; पण शाळेबाहेर तो बहुरूपी आहे', या मामूसंबंधी केलेल्या विधानाचा अर्थ पाठाधारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) मामूच्या संवेदनशीलतेची दोन उदाहरणे तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) मामूच्या व्यक्तित्वाचे (राहणीमान, रूप) चित्रण तुमच्या शब्दांत करा.

(४) अभिव्यक्ती.

(अ) 'मामू' या पाठाची भाषिक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(आ) मामूच्या स्वभावातील विविध पैलूंचे विश्लेषण करा.

(इ) 'माणसापेक्षा माणुसकी फार फार मोठी आहे!', या विधानातील आशयसौंदर्य तुमच्या शब्दांत लिहा.

प्रकल्प.

तुमच्या परिसरातील 'मामू' सारख्या बहुगुणी व्यक्तीचा शोध घ्या. त्याच्या व्यक्तिविशेषांचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

## ✻ भाषाभ्यास ✻

- **उपसर्गघटित शब्द–** शब्दांच्या पूर्वी उपसर्ग लागून जे शब्द तयार होतात त्यांना 'उपसर्गघटित' शब्द म्हणतात. उदा., अवघड, भरधाव, अतिशय, उपसंपादक, बेडर, नापसंत.
- **प्रत्ययघटित शब्द–** शब्दाच्या किंवा धातूच्या पुढे एक किंवा अधिक प्रत्यय लागून काही शब्द तयार होतात, अशा शब्दांना 'प्रत्ययघटित' शब्द असे म्हणतात.
  उदा., दुकानदार, गुलामगिरी, खोदाई, टाकाऊ, झोपाळू, मानसिक, जडत्व, खोदाईसाठी.
- **अभ्यस्त शब्द–** द्वित्व किंवा पुनरावृत्तीने तयार झालेले शब्द म्हणजे 'अभ्यस्त' शब्द होत.
  (अ) पूर्णाभ्यस्त शब्द– एक शब्द पुन: पुन्हा येऊन एक जोडशब्द तयार होतो, तेव्हा त्यास 'पूर्णाभ्यस्त शब्द' म्हणतात. उदा., लाललाल, तिळतिळ, हालहाल, फडफड इत्यादी.
  (आ) अंशाभ्यस्त शब्द– काही वेळा शब्दात त्याच शब्दाची पूर्ण पुनरावृत्ती न होता एखादे अक्षर बदलून येते. अशा शब्दास 'अंशाभ्यस्त' शब्द म्हणतात.
  उदा., आंबटचिंबट, भाजीबिजी, गोडधोड, अडलंनडलं इत्यादी.
  (इ) अनुकरणवाचक शब्द– काही शब्दांत ध्वनिवाचक शब्दांची पुनरावृत्ती साधलेली असते, त्या शब्दांना 'अनुकरणवाचक' शब्द असे म्हणतात.
  उदा., गडगड, वटवट, किरकिर इत्यादी.